**JAMKHED MAHAVIDYALAYA, JAMKHED**
Dist. Ahmednagar (MS)

दिनांक ९ मार्च २०२३

जामखेड महाविद्यालयात रसायन शास्त्र विभागाच्या वतीने एक दिवसीय कार्यशाळा उत्साहात संपन्न...

दि पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे जामखेड च्या जामखेड महाविद्यालय, जामखेड व रसायनशास्त्र विभागाच्या वतीने आज कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च, पुणे या संस्थेचे कार्याध्यक्ष व जेष्ठ संशोधक मा डॉ अरविंद नातु यांच्या विशेष सहकार्याने महाविद्यालयास सुमारे पाच लाख रुपये किंमतीचे, रोटाव्हेपर उपकरण भेट म्हणून मिळाले आहे. त्यासाठी संस्थेचे सचिव मा. श्री शशिकांत देशमुख, शिरूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ के. सी. मोहिते व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. एल. डोंगरे यांनी विशेष प्रयत्न केले. रोटाव्हेपर उपकरण इन्स्टॉल करण्यासाठी BUCHI, India मुंबई चे श्री सुशांत दास आणि श्री स्वेतल खोपकर यांनी पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी सेफ्टी अँड ड्युटी युजिंग इन्स्ट्रुमेन्ट या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षपद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. एल. डोंगरे यांनी भूषविले. तसेच कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. नरके एस. वाय. व विविध विभागांचे विभाग प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. गोलेकर एस.एम. यांनी केले

श्री सुशांत दास यांनी रोटाव्हेपर उपकरण कसे हाताळावे, तसेच या उपकरणाची माहिती आणि फायदे सांगितले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संशोधन करण्यासाठी या ऊपकरणचा विशेष लाभ होणार आहे. अध्यक्षीय भाषणामध्ये विद्यार्थ्यांनी संशोधनाकडे लक्ष केंद्रित करून अश्या प्रकारच्या सुविधाचा लाभ घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ डोंगरे यांनी केले. तसेच दिनांक २४ व २५ मार्च २०२३ रोज महाविद्यालयात दोन दिवसांची राष्ट्रीय पातळीवरील परिषदेचे आयोजन करण्यात आले असून त्या वेळी मा डॉ अरविंद नातु, शिक्षण तज्ञ मा.डॉ अ ल देशमुख पुणे, प्राचार्य डॉ मोहिते ,, डॉ शरद पासले मुंबई व अनेक इतर नामवंत संशोधक मान्यवर उपस्थित राहणार असुन मार्गदर्शन करणार आहेत. विद्यार्थाना नविन संशोधन करण्यासाठी चालना देण्यासाठी महाविद्यालयात प्रयत्न केले जात आहेत. तरी या संधीचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ डोंगरे यांनी केले आहे. संस्थेचे अध्यक्ष श्री उद्धव बापू देशमुख व उपाध्यक्ष श्री अरुण काका चिंतामणी यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.सदर कार्यक्रमा साठी IQAC समन्वयक व विज्ञान विभाग प्रमुख प्रा डॉ गाडेकर, गणित विभाग प्रमुख डॉ पुराणे एस. जी, रसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रा गोलेकर एस. एम, प्रा. सौ. साबळे वाय. डी., डॉ. सरवदे व्ही.डी.

वनस्पती शास्र विभागाचे डॉ. बारस्कर एस. एम., प्रा. साळवे एन. आर., राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा फलके ए.बी. उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा श्री तरटे सर यांनी केले व श्री राळेभात एस. ए. यांनी उपस्थितांचे आभार मानले.

